# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १२/१०/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

### विनयभंग

१) पो.स्टे. जलालखेडा:— दिनांक ११/१०/२०२२ चे १३.३० वा. दरम्यान फिर्यादी/पीडिता वय २० वर्ष ही आपले घरी बाहेरील अंगणात कपडे वाळु टाकण्यास गेली असता आरोपी नामे— सोंटी ठाकरे, वय ३५ वर्ष, रा. नारसिंगी याने तिला अश्लिल शब्दात बोलुन पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, २९४ भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जोशी हे करीत आहे.

२) पो.स्टे. कळमेश्वर :— दिनांक ११/१०/२०२२ चे ०८.३० वा. ते ०८.४५ वा. दरम्यान फिर्यादी/पीडिता वय १९ ही घरून आपल्या मैत्रीणी सोबत कॉलेज करीता निघाली असता आरोपी नामे— साहेब यादव, वय ३० वर्ष, रा. इंदीरानगर झोपडपट्टी वार्ड क्र.१५ कळमेश्वर हा घरापासुन कॉलेज पर्यंत तिच्या मागे—मागे तिचा पाठलाग करत गेला व तिला कॉलेज जवळ थांबवुन 'तु माझे सोबत बोल' तिने बोलण्यास नकार दिला असता पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने तिला म्हटले की, 'तु जर माझे म्हणणे एकले नाही तर तुझ्या वडीलांना व भावला मारील व तुला कॉलेजला जावु देणार नाही' अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४(ड), ३२३, ५०४, ५०६ भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि शिवाजी मुंडे मो.नं. ९४०३९५१२३६ हे करीत आहे.

# अकस्मात मृत्यू

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी :–** अंतर्गत शुभम बॅटरी कंपनी एमआयडीसी बोरी येथे दिनांक ०५/१०/२०२२ चे ०८.३० वा. चे पुर्वी **शुभम शिवकुमार सिंग(मृतक) वय २८ वर्ष, रा. इंडोरामा कॉलनी नं. २** हा दि. ०५/१०/२२ रोजी सकाळी ०७.०० वा. दर. एमआयडीसी बोरी येथील सोलरचे काम करीत असतांना सिमेन्ट शिट तुटल्याने वरून खाली पडल्याने मार लागला. त्यास उपचाराकामी माया हॉस्पीटल येथे नेले असता प्राथमिक उपचार करून नंतर न्युरॉन हॉस्पीटल धंतोली नागपूर येथे भर्ती केले असता उपचारा दरम्यान मरण पावला. पोस्टे धंतोली येथील ००/२२ क १७४ जाफौ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने मर्ग नोंद करून चौकशीत घेतला नोंद.

सदर प्रकरणी पोहवा राजु भोंगाडे पोस्टे धंतोली नागपूर शहर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार करपाते हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर